**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**

खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)

मो. नं. 9271713368, 9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक २२५ । मंगळवार २ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# वीस हवालदार झाले सहायक फौजदार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर जिल्हा पोलीस दलातील २० पोलीस हवालदारांना सहायक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) पदावर पदोन्नती जाहीर करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस घटकाच्या आस्थापनेवरील एकूण २० पोलीस हवालदारांना त्यांच्या भरती दिनांकानुसार आणि विहित अटी व शर्तींची पूर्तता केल्यामुळे सहायक फौजदार होण्याची ही संधी मिळाली आहे. शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सध्याच्या नेमणुकीच्या ठिकाणीच ही पदोन्नती देण्यात आली आहे.

पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे, घारगाव (ता. श्रीगोंदा), कर्जत, कोतवाली, तोफखाना, नगर तालुका आणि पोलीस मुख्यालय अहिल्यानगर येथील अनुभवी अंमलदारांचा समावेश आहे. या पदोन्नतीमुळे सर्व कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन लागू होणार आहे.

### पदोन्नती मिळालेले कर्मचारी व नियुक्तीचे ठिकाण याप्रमाणे

१. दीपक रावसाहेब कदम (श्रीरामपूर शहर पोस्टे) २. सुरेश गंगाधर औटी (श्रीरामपूर शहर पोस्टे) ३. जगदीश देवराम जंबे (नगर तालुका पोस्टे) ४. दिनेश उत्तम चक्रनारायण (पो. मु. अहिल्यानगर) ५. अजय विजय खंडागळे (पो.मु. अहिल्यानगर) ६. रामभाऊ विठोबा भुतांबरे (घारगाव पोस्टे) ७. बबन रामराव पवार (कर्जत पोस्टे) ८. सुनील बाबासाहेब आंधळे (तोफखाना पोस्टे) ९. सुनील जगन्नाथ शिरसाठ (कोतवाली पोस्टे) १०. विठ्ठल विश्वनाथ पेटारे (पो.मु. अहिल्यानगर) ११. बाळासाहेब ताराचंद राठोड (नियंत्रण कक्ष) १२. गणेशसिंग किसन परदेशी (नियंत्रण कक्ष) १३. आलम पापाभाई पटेल (शहर वाहतूक शाखा, शिर्डी), १४. दत्तात्रय शिवाजी शिंदे (श्रीरामपूर शहर पोस्टे) १५. उमेश भानुदास इंगवले (संगमनेर शहर पोस्टे) १६. शेख रियाज अहमद उस्मान (कोतवाली पोस्टे) १७. सुकदेव बाबा दहातोंडे (पो.मु. अहिल्यानगर) १८. नारायण महादू ढोकरे (घारगाव पोस्टे) १९. राजू अनाजी गोडे (पो.मु. अहिल्यानगर) २०. संतोष दामोधर शिंदे (एमआयडीसी पोस्टे).

# लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या पुरुषांकडून सगळे पैसे वसूल करणार!

**। मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती**
**। केवायसी विंडो ओपन करण्याची तयारी**



**मुंबई । वृत्तसंस्था –** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न करणे, निकषांची पूर्तता न करणे आणि अर्जातील त्रुटी ही यामागील प्रमुख कारणे आहे. अपात्र ठरलेल्या महिलांचे या योजनेंतर्गत मिळणारे १५०० रुपये बंद झाले आहेत. ८० लाख महिला अपात्र ठरल्यानंतर विरोधकांनी महायुती सरकारला धारेवर धरलं आहे. याचदरम्यान आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषद घेत लाडकी बहीण योजनेवर भाष्य केले आहे.

लाडकी बहीण योजना सुरु केली तेव्हा काही निकष होते. त्याद्वारे आपण पूर्तता केली होती आणि बहीणींना लाभ दिला होता. अर्थातच सरकारी पैसा खर्च करतो तेव्हा सीएजी ऑडिट होतं. योजना सुरु झाल्यावर आपण केवायसी सुरु केलं. सरकारी कर्मचारी आहेत, त्यासंदर्भात माहिती घेतली. परिवहन विभाग आहे, ■ पान ४ वर

### या कारणांमुळे अनेकजण अपात्र

ज्या लाडक्या बहिणी योजनेच्या निकषात बसत नाही आणि ज्यांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही त्या ८० लाख लाडक्या बहिणींना यामध्ये वगळण्यात आल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. अलीकडे केलेल्या तपासणीत चार ते पाच लाख लाभार्थी असे निघाले ज्यांच्याकडे चारचाकी गाडी आहे. अजूनही काही महिलांना वाटत असेल की, त्या पात्र असून त्यांना योजनेचा लाभ मिळत नाही. त्यासाठी पुन्हा एकदा केवायसी विंडो ओपन करण्याची सरकारची तयारी आहे. लाडकी बहीण योजना जेव्हा सुरू केली, तेव्हा या योजनेचे निकष होते. उत्पन्नाचे निकष होते. वयाचे निकष होते, शासकीय नोकरी असेल तर योजनेचा फायदा घेता येणार नाही. चारचाकी गाडी असेल तर योजनेत सहभागी होता येणार नाही, असे अनेक निकष होते, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# समृद्धी महामार्गावर लुटमार करणारी सहाजणांची आंतरजिल्हा टोळी जेरबंद

**सव्वानऊ लाखांचा मुद्देमाल हस्तगत**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समृद्धी महामार्गावर वाहने अडवून प्रवाशांना मारहाण व लुटमार करणाऱ्या सहाजणांच्या आंतरजिल्हा टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. यातील एकजण विधीसंघर्षीत बालक असून, या टोळीकडून ९ लाख २८ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दिनांक २७ मे रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास लातूर येथील ट्रकचालक दत्ता बाबूराव राजुळे हे डिझेल घेऊन जात असताना समृध्दी महामार्गावरील पोल क्र. ५२९.९ जवळ ७ ते ८ आरोपींनी त्यांना लोखंडी रॉडने मारहाण करत ट्रकचालकाकडून डिझेल आणि रोख रक्कम मिळून ७ हजार ४६५ रुपयांचा माल लुटला. एवढ्यावरच न थांबता या टोळीने एका वॅगनआर कारचालकाला आणि त्याच्या पत्नीला धमकावून १ लाख २४ हजार रुपयांचे दागिने व रोख रक्कम लुटली. त्यानंतर पुन्हा एका दुसऱ्या ट्रक चालकाला मारहाण करून १५० लीटर डिझेल व रोख रक्कम असा १८ हजार ९५० रुपयांचा माल ■ पान ४ वर

# धारदार कोयत्यांसह चार सराईत जेरबंद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील गणेश चौक, बोल्हेगाव येथे हातात धारदार कोयते घेऊन नागरिकांना शिवीगाळ करत दहशत माजवणाऱ्या ४ सराईत गुन्हेगारांना एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून ३ धारदार लोखंडी कोयते जप्त करण्यात आले असून, एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक ३१ मे रोजी रात्री एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि माणिक चौधरी यांना गोपनीय माहिती मिळाली की, गणेश चौक भागात काही तरुण हत्यारांसह दहशत निर्माण करत आहेत. माहिती मिळताच पथकाने प्रेम नरेंद्र भाकरे (वय २३, रा. नागापूर), अभिषेक उर्फ भोऱ्या अरविंद भिंगारदिवे (वय २०, रा. नागापूर), बंट्या उर्फ ■ पान ४ वर

# स्व.बाळासाहेब विखे यांचे दुष्काळ मुक्तीचे स्वप्न ना.विखे यांनी पूर्ण करावे - अण्णासाहेब हजारे

**ना. विखे यांनी घेतली हजारेंची सदिच्छा भेट**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्व.बाळासाहेब विखे पा.यांनी पाहिलेले महाराष्ट्र दुष्काळमुक्तीचे स्वप्न त्यांचे सुपुत्र व राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पा. यांच्या कारकिर्दीत पुर्ण व्हावे,'' अशी अपेक्षा ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण श्री.अण्णासाहेब हजारे यांनी व्यक्त केली.

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज राळेगणसिद्धी येथे जाऊन पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी झालेल्या अनौपचारिक चर्चेत श्री. हजारे यांनी ही अपेक्षा व्यक्त केली. ना. विखे पा. यांनी राळेगणसिद्धी येथे जाऊन पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी ना . विखे यांच्यासमवेत भारतीय जनता पक्षाचे जिल्हा समन्वयक श्री. विनायकराव देशमुख होते.

यावेळी मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सूरू असलेल्या कामाची तसेच राज्य दुष्काळ मुक्त करण्याच्या दृष्टीने हाती घेण्यात आलेल्या विविध योजनांची आणि उपक्रमांची माहिती श्री. हजारे यांना दिली.

प्राधान्याने शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून निर्णयांना प्राधान्य देण्यात येत असल्याने प्रामुख्याने कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळाच्या अखत्यारितील अनेक नवीन प्रकल्प सुरू करण्यात येत असून, धरणातील गाळ काढण्याचे धोरणही राज्य सरकारने घेतले आहे.यामध्ये अहील्यानगर जिल्ह्यातील मुळा धरणाचा समावेश केला असल्याचे ना. विखे यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाने राज्यातील नदीजोड प्रकल्पाच्या कामांना विशेष प्राधान्य दिले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाच्या कार्यवाहीचे काम गतीने पुढे ■ पान ४ वर

# खा. संजय राऊतांनी घेतला शहर ठाकरे शिवसेनेचा संघटनात्मक आढावा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे फायर ब्रँड नेते खा. संजय राऊत अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी शिर्डीच्या हॉटेल सन अँड सेंड येथे अहिल्यानगर शहर शिवसेनेचा संघटनात्मक आढावा घेतला. ग्रामीण जिल्हा शिवसेनेच्या मेळाव्या करिता ते शिर्डी येथे आले होते.

निवडणुका येतात जातात. शिवसेना आणि शिवसैनिकांसाठी संघर्ष नवा नाही. नव्या जोमाने संघटनेची बांधणी करा. चुकीच्या कारभारामुळे सत्ताधाऱ्यां विषयी देशातील जनतेच्या मनात मोठी अस्वस्थता आहे. लोकांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठवा, असा संदेश यावेळी खा. राऊतांनी शहरातील पदाधिकाऱ्यांना दिला.

यावेळी महानगर प्रमुख किरण काळे, उपजिल्हाप्रमुख पै. दीपक भोसले, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, कामगार आघाडीचे विलास उबाळे, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, किशोर कोतकर, ■ पान ४ वर

# धक्कादायक... पाचोडमध्ये नराधम तरुणाने ८० वर्षीय वृद्ध महिलेवर केला अत्याचार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–**तालुक्यातील पाचोड येथील कल्याणनगर परिसरात मदतीच्या बहाण्याने ८० वर्षीय वृद्धेवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पाचोड पोलिस ठाण्यात एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित वृद्ध महिला एकट्याच वास्तव्यास आहेत. त्यांची मुले कामानिमित्त बाहेरगावी राहत असल्याने त्या घरी एकट्या असतात. दरम्यान, १ जून रोजी दुपारी सुमारे ३ वाजेच्या सुमारास रोहन साहेबराव आहीरे (वय २८, रा. कल्याणनगर, पाचोड) हा मदतीच्या बहाण्याने वृद्ध महिलेला घरात घेऊन गेला. त्यानंतर त्याने तिच्याशी झटापट करत लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. घटनेदरम्यान वृद्ध महिलेने आरडाओरड केल्यानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत हस्तक्षेप केला. त्यानंतर संबंधित महिलेने नातेवाईकांच्या मदतीने पाचोड पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून पाचोड पोलिसांनी आरोपी रोहन साहेबराव आहीरे याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक २२९/२०२६ नोंदविला आहे. त्याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ६४(२) व ६४(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे पाचोड परिसरात खळबळ उडाली असून वृद्धांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलीस ठाण्यात नागरिकांनी केली गर्दी माणुसकीला काळीमा फासणारी घटना पाचोड मध्ये उघडकीस येताच ■ पान ४ वर

# खोटा गुन्हा मागे घेऊन फिर्यादीवर कारवाई करा; समस्त आंबेडकरी समाजाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पारनेर पोलीस ठाण्यात ३० मे २०२६ रोजी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सुमेध गायकवाड यांचे नाव अन्यायकारकपणे व खोट्या पद्धतीने समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप करत, संबंधित गुन्ह्याची सखोल चौकशी करून तो मागे घ्यावा तसेच खोटी फिर्याद दाखल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ आंबेडकरी नेते अशोक गायकवाड, नगरसेवक सुरेश बनसोडे, सुनील शेत्रे, सुनील शिंदे, किरण दाभाडे, अमित काळे, विशाल कांबळे, जी. डी. गायकवाड, अनिल काळे, किरण गायकवाड, गौतम म्हस्के, प्रतीक सोनवणे, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, सागर ठोकळ, सचिन शेलार, यशवंत भांबळ, सुनील हिवाळे, विलास साठे सर , प्रा जाधव सर , गौतमी भिंगारदिवे, विवेक विधाते, महेश भोसले, सागर ढगे, बाळासाहेब सूर्यवंशी, संजय साळवे, विशाल गायकवाड, दिलीप साळवे, सिद्धांत गायकवाड , संघराज गायकवाड , सुजन भिंगारदिवे, कृष्णा गाडे, राजेंद्र शिरसाट, सिद्धार्थ राजगुरु,पोपटराव पाथरे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर महापुरुषांबाबत सोशल मीडियावर अवमानकारक मजकूर प्रसारित करून जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी मंगेश बरकसे यांनी पारनेर पोलीस ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### महाराष्ट्र अंनिस अहिल्यानगर शहर कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग संपन्न



अहिल्यानगर- शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अहिल्यानगर शहर शाखेचे दि. ३० व ३१ मे २०२६ रोजी अहिल्यानगर येथे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. जिल्हाध्यक्ष अरुण कडू पाटीलव कार्याध्यक्ष मधुकर अनाप यांचे प्रयत्नातून व प्रमुख उपस्थितीत विविध क्षेत्रातील ५० हून अधिक कार्यकर्ते या प्रशिक्षणासाठी उपस्थित होते.महाराष्ट्र अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. अस्मिता बालगावकर, रमेश माने, चंद्रकांत ऊळेकर, हेमंत धानोरकर यांचे सह मधुकर अनाप यांनी प्रशिक्षण वर्गाला मार्गदर्शन केले.पाण्याचा दिवा पेटवून प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. जिल्हाध्यक्ष अरुण कडू पाटील यांनी अंनिस चळवळीत सहभागी झाल्याबद्दल उपस्थित प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले. सध्या वाढत असलेली बुवाबाजी ,अंधश्रद्धा , अनिष्ट रूढी परंपरा ही चिंतेची बाब आहे त्यामुळे आपण सर्वांनी या सामाजिक कार्यात अधिक जोमाने काम करावे असे आवाहन केले.

दोन दिवसाच्या प्रशिक्षणात प्रशिक्षणा मागील भूमिका, कार्यकर्त्यांची आचारसंहिता, महाराष्ट्र अंनिस चे विविध उपक्रम या विषयावर मधुकर अनाप यांनी मार्गदर्शन केले.मन ,मनाचे आजार व अंधश्रद्धा, स्त्रिया आणि अंधश्रद्धा या विषयावर डॉ.अस्मिता बालगावकरयांनी मार्गदर्शन केले. संत समाज सुधारक आणि अंधश्रद्धा निर्मूलन, शाखेची रचना व शाखा कशी चालवावी,बुवाबाजी मागील वैचारिक भूमिका या विषयावर रमेश माने यांनी विस्तृत प्रमाणात दाखले देऊन मार्गदर्शन केले.वैज्ञानिक दृष्टिकोन, खगोलशास्त्र आणि ज्योतिष शास्त्रातील फोलपणा या विषयावर हेमंत धानोरकर यांनी अतिशय प्रभावीपणे मांडणी केली.श्रद्धा अंधश्रद्धा, जादूटोणा व सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा विषयी चंद्रकांत ऊळेकर यांनी मार्गदर्शन केले. जगात कोणीही चमत्कार करू शकत नाही त्यामागे वैज्ञानिक कारण किंवा हात चलाखी असते त्यामुळे कोणीही भोंदूगिरीला बळी पडू नये असे आवाहन करून चमत्कारा मागील विज्ञानाचे प्रयोग प्रशिक्षणार्थींना दाखवून ते कसे करावेत व काय काळजी घ्यावी याविषयीचे मार्गदर्शन प्रमुख मार्गदर्शकांनी केले.

### निमगाव वाघात एस.टी. प्रवास सवलतींसाठी स्मार्ट कार्ड नोंदणी



अहिल्यानगर - निमगाव वाघा (ता. नगर) येथे एकता फाऊंडेशनच्या वतीने ग्रामस्थांच्या सोयीसाठी एस.टी. महामंडळाच्या प्रवासासाठी आवश्यक असलेल्या स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच विविध घटकांतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ग्रामपंचायत कार्यालयासमोर असलेल्या नवनाथ मंदिराच्या सभामंडपात हे शिबिर पार पडले. ग्रामीण भागातील नागरिकांना एसटीच्या योजनांचा लाभ सहजपणे मिळावा आणि प्रवासासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी दूरवर जावे लागू नये, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरादरम्यान महिलांनी तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली. या कार्डच्या माध्यमातून महिलांना एस.टी. प्रवासात ५० टक्के सवलतीचा लाभ मिळणार असून ज्येष्ठ महिला व पुरुषांनाही अर्ध्या तिकिटाची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच वयोवृद्ध नागरिकांना शासनाच्या धोरणानुसार मोफत प्रवासाचा लाभ घेण्यासाठीही हे स्मार्ट कार्ड उपयुक्त ठरणार आहे.

# संस्थेची प्रगती समर्पित कर्मचाऱ्यांमुळे होते - डॉ. रवींद्र साताळकर

**ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटीत सेवाभावी कार्याचा गौरव; मतीमंद मुलांवर ‘लहान पावले उज्ज्वल भविष्य’ पुस्तकाचे प्रकाशन**
**विजय बळीद यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार; शिक्षण व पुनर्वसन क्षेत्रासाठी मार्गदर्शक पुस्तकाचे अनावरण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मतिमंद विकास शिक्षण मंडळ संचलित ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटी कार्यशाळेतील कनिष्ठ लिपिक विजय मानाजी बळीद यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळात संस्थेच्या प्रगतीसाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यात आला. याच कार्यक्रमात मतिमंद मुलांच्या शाळेतील वाचा उपचार तज्ज्ञ विक्रम उंडे लिखित ‘लहान पावले उज्ज्वल भविष्य’ या पुस्तकाचे प्रकाशन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

मतिमंद विकास शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर यांच्या हस्ते विजय बळीद व सौ. वर्षा बळीद यांचा सपत्नीक मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या प्रामाणिक, निष्ठावंत व सेवाभावी कार्याचा गौरव उपस्थित मान्यवरांनी केला. संस्थेच्या उभारणीसाठी आणि विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान मोलाचे असून त्यांच्या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळेल, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या.

तसेच डॉ. साताळकर यांच्या हस्ते विक्रम उंडे लिखित ‘लहान पावले उज्ज्वल भविष्य’ या पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले. मतिमंद मुलांच्या शिक्षण, सर्वांगीण विकास आणि पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत असलेल्या पालक, शिक्षक, विशेष शिक्षक, वाचा उपचार तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. बौद्धिक अक्षम मुलांच्या संगोपनातील आव्हाने, त्यावरील उपाययोजना आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचा समावेश या पुस्तकात करण्यात आल्याने ते समाजासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास मतिमंद विकास शिक्षण मंडळाचे सचिव पी. डी. कुलकर्णी, ज्येष्ठ सदस्य अविनाश कुलकर्णी, सदस्य मकरंद खंडागळे तसेच कार्यशाळेचे इन्चार्ज भाऊसाहेब कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मतिमंद मुलांची शाळा, पाथर्डी यांच्या अध्यक्षा अनिता निराळी, मुख्याध्यापक विजय आरोटे, दिलीप जगधने, अतुल भंडारे, चांगदेव खेमनर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून विजय बळीद यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव केला. तसेच ‘लहान पावले उज्ज्वल भविष्य’ या पुस्तकाच्या सामाजिक आणि शैक्षणिक उपयुक्ततेवर प्रकाश टाकला. यामध्ये पी. डी. कुलकर्णी, अविनाश कुलकर्णी, मकरंद खंडागळे, सुधीर रणदिवे, रूपाली भिसे आदींनी आपले विचार व्यक्त केले.

डॉ. रवींद्र साताळकर म्हणाले की, विजय बळीद यांनी आपल्या सेवाकाळात जबाबदारीने काम केले. कोणत्याही संस्थेची प्रगती केवळ इमारतींमुळे होत नाही, तर त्या संस्थेत कार्य करणाऱ्या समर्पित कर्मचाऱ्यांमुळे होत असते. बळीद यांचे योगदान हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. तर विक्रम उंडे यांनी लिहिलेले ‘लहान पावले उज्ज्वल भविष्य’ हे पुस्तक केवळ पुस्तक नसून विशेष मुलांच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या पालक, शिक्षक आणि समाजासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. विशेष मुलांना समजून घेण्यासाठी संवेदनशीलता, संयम आणि योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. हे पुस्तक त्या दिशेने महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लेखक विक्रम उंडे यांचे बौद्धिक अक्षम मोठे बंधू सुधीर उंडे, वडील राजाराम उंडे, आई हिराबाई उंडे तसेच उंडे कुटुंबातील नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी, पालक, हितचिंतक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थित राहून दोन्ही उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळेचे इन्चार्ज भाऊसाहेब कदम यांनी केले. त्यांनी विजय बळीद यांच्या सेवाकार्याचा आढावा घेत ‘लहान पावले उज्ज्वल भविष्य’ या पुस्तकाची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधवी कुटे यांनी केले तर विक्रम उंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**३२ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन**

# धाराशिवमध्ये लक्षवेधी ठरले कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचे कथाकथन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे ३२ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन धाराशिव येथे संपन्न झाले. संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नंदकुमार राऊत होते.

संमेलनमध्ये चर्चासत्र, कथाकथन, कवी संमेलन ,विविध क्षेत्रातील मान्यवरांचे सन्मान ,असे विविध कार्यक्रम दोन दिवस भरगच्च होते. कथाकथन कार्यक्रम अध्यक्षपदी प्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे हे होते कथाकथनमध्ये कथालेखक बाळासाहेब देशमुख अहिल्यानगर, संतोष चव्हाण माढा, प्रा. डॉ अर्जुन व्हटकर सोलापूर इ. मान्यवरांनी कथाकथन मध्ये सहभाग घेतला.

अहिल्यानगरचे कथालेखक श्री बाळासाहेब देशमुख यांनी हरवलेला संवाद संमेलन मध्ये सादर केला. आजी आजोबांचा शेवटचा मित्र म्हणजे त्यांची नातवंडे. तर नातवंडांचा पहिला मित्र म्हणजे आजी आजोबा. यांच्या भावविश्वावर भाष्य करणारी कथा बाळासाहेब देशमुख यांनी सादर केली. सकस कथाक, देहबोली, आवाजातील चढ उतार, उत्कृष्ट शब्द फेक याद्वारे कथा , संमेलन मध्ये लक्षवेधी ठरली. त्या प्रसंगी सारे सभागृह मंत्रमुग्ध झाले होते. आजी आजोबांच्या सहवासात, नातवंडांवरती जे जे संस्कार होतात. त्यातून एक सकस, राष्ट्राला तारणारी पिढी तयार होते. हल्लीची मुले, हुशार, चाणाक्ष व जिज्ञासू आहेत. आजी आजोबांच्या सुसंस्काराने चांगली जडणघडण करत, आपले आयुष्य घडवतात. हा लक्षवेधी संदेश रसिकांना मिळाला.

कथाकथन कार्यक्रम प्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद अध्यक्ष गोरे, अजय श्रीखंडे, फुलचंद नागटिळक, विविध राज्यातून आलेले हजारो साहित्यिक उपस्थित होते.

# गावठी हातभट्टी अड्ड्यांवर देवळाली प्रवरा येथे छापे

**६५ हजारांचा मुद्देमाल जप्त । ५ जणांवर गुन्हा दाखल**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा परिसरातील गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या अड्ड्यांवर छापे टाकून ६५ हजार ८६५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, विशाल तनपुरे आणि भगवान थोरात यांचे पथक ३१ मे रोजी राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना देवळाली प्रवरा गावच्या शिवारात गणेश गायकवाड हा व्यक्ती हातभट्टीची दारू तयार करत असल्याची माहिती मिळाली. पथकाने देवळाली प्रवरा शिवारात वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून गणेश रमेश गायकवाड (वय २७, रा. फत्तेराज महाराज मंदिराजवळ, देवळाली प्रवरा), रवींद्र दिगंबर डुकरे (रा. देवळाली प्रवरा), राजेंद्र धोंडीराम उंडे (वय ५४, रा. देवळाली प्रवरा), बापू भास्कर गायकवाड (रा. वडारवाडा, देवळाली प्रवरा) व रामचंद्र विठ्ठल काळे (वय ६२, रा. राहुरी फॅक्टरी, ता. राहुरी) यांच्यावर या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २७५ सह महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ग्रामसेवकाच्या बदलीसह अतिक्रमण नियमिती करणाची मागणी; आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** चनकवाडी (तेलवाडी) येथील नागरिकांनी ग्रामसेवकाच्या बदलीसह गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमित करण्याची मागणी पंचायत समितीकडे केली आहे. यासंदर्भात गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गट क्रमांक १३७, १५ व १३ परिसरातील अनेक नागरिक गेल्या चार दशकांहून अधिक काळ वास्तव्यास आहेत. मात्र अद्याप त्यांच्या घरांचे नियमितीकरण झाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शासनाच्या २०११ पूर्वीच्या धोरणानुसार संबंधित अतिक्रमणे नियमित करण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच ग्रामसेवक प्रशांत पाटील यांच्या कार्यपद्धतीबाबत तक्रारी करत त्यांच्या बदलीची मागणी करण्यात आली आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी करून आवश्यक कारवाई करावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास ८ जून २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा अर्जदार रामराव यशवंता बोठे व इतर लाभार्थ्यांनी दिला आहे.

# पेट्रोल–डिझेल, गॅस दरवाढीविरोधात भाकपचे निदर्शने

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या सतत वाढत असलेल्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान ढासळत असून महागाईच्या झळा प्रत्येक घटकाला बसत आहेत. या वाढत्या महागाईच्या निषेधार्थ तसेच केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सोमवारी (दि.१ जून) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी इंधन दरवाढ तातडीने कमी करावी आणि आवश्यक वस्तूंच्या किमतींवर नियंत्रण आणावे, अशी मागणी करण्यात आली.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सहसेक्रेटरी कॉ. अ‍ॅड. सुधीर टोकेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात आयटकचे कॉ. सतीश पवार, कॉ. सुभाष ठुबे, सुभाष शिंदे, बाळासाहेब बहिरट, कन्हैया बुंदेले, प्रा. सुभाष कडलग, ज्ञानदेव गायकवाड यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

देशभरात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या किमतींमध्ये सातत्याने वाढ होत असून त्याचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. इंधन हे जीवनावश्यक गरजांशी निगडित असल्याने त्याच्या दरवाढीचा परिणाम वाहतूक, शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण आणि घरगुती खर्च अशा सर्व क्षेत्रांवर होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

भाकपच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, सरकार नागरिकांना काटकसरीचा सल्ला देत असले तरी प्रत्यक्षात इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे सामान्य माणसाचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये चढ-उतार होत असले तरी त्याचा संपूर्ण आर्थिक भार जनतेवर टाकणे योग्य नाही. सरकारने कररचनेत सवलत देऊन नागरिकांना दिलासा देण्याची गरज आहे.

# पोस्टल : भूमीपुत्रांचा गौरव; गुणवंत कर्मचारी व विद्यार्थ्यांचा सत्कार

**संस्थेच्या वार्षिक सभेत ‘सन्मान भूमीपुत्रांचा’ सोहळा उत्साहात**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर डिस्ट्रिक्ट नॅशनल पोस्टल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर यांच्या दहाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन हॉटेल राजयोग कॉन्फरन्स हॉल येथे संस्थेचे चेअरमन कमलेश मिरगणे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

सभेच्या द्वितीय सत्रात आयोजित करण्यात आलेल्या ‘सन्मान भूमीपुत्रांचा’ या विशेष गौरव सोहळ्याचे अध्यक्षस्थान डाक विभागाचे प्रवर अधीक्षक विकास पालवे () यांनी भूषविले. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्याच्या मातीतून घडलेल्या आणि भारतीय टपाल सेवेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या दोन मान्यवर अधिकाऱ्यांचा संस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.



वंजारवाडी (ता. नेवासा) येथील रहिवासी तथा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या () परीक्षेत यश संपादन करून भारतीय टपाल सेवेत () प्रवेश मिळविल्यानंतर विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडत सध्या प्रवर अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर म्हणून कार्यरत असलेले विकास पालवे यांचा तसेच चोभेवाडी (ता. जामखेड) येथील रहिवासी व खातेअंतर्गत परीक्षेत यश संपादन करून वरिष्ठ पोस्टमास्तर पदाची धुरा सांभाळणारे अमृत कुमटकर यांचा गौरव करण्यात आला.

अहिल्यानगर डाक विभागातील दोन्ही प्रमुख अधिकारी हे जिल्ह्याचेच भूमीपुत्र असल्याचा दुर्मीळ योग साधत त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थेचे ज्येष्ठ सभासद संतोष यादव यांनी दिली.

यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यकर निरीक्षक () परीक्षेत यश प्राप्त करणारे सौरभ शिवाजीराव लांडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच डाक विभागातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गुणवंत कर्मचाऱ्यांचा, सेवानिवृत्त सभासदांचा आणि सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव करण्यात आला.

गुणवंत कर्मचारी म्हणून रुपाली खेडकर (शाखा डाकपाल, मेहकरी), असिफ शेख (एमटीएस, प्रधान डाकघर अहिल्यानगर), सुनील रोकडे (पोस्टमन, टाकळी ढोकेश्वर), शुभांगी मांडगे (डाक सहाय्यक, प्रधान डाकघर अहिल्यानगर) आणि संभाजी बसवेकर (सब पोस्टमास्तर, मिरजगाव) यांचा सन्मान करण्यात आला.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कच्या सुशोभीकरणासाठी निधीची मागणी



अहिल्यानगर - भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कच्या सुशोभीकरणासाठी व विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ व सचिन चोपडा यांनी आमदार जगताप यांना निवेदन देऊन उद्यानातील प्रलंबित कामांकडे लक्ष वेधले.भिंगार परिसरातील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क हे नागरिकांसाठी आरोग्यदायी व नैसर्गिक वातावरण उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे ठिकाण आहे. या उद्यानात दररोज शहरासह भिंगार उपनगर आणि पंचक्रोशीतील शेकडो नागरिक सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी, व्यायामासाठी तसेच आरोग्य संवर्धनासाठी येत असतात. नागरिकांच्या सहभागातून हरदिन मॉर्निंग ग्रुपने उद्यान परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची व्यापक मोहीम राबवून हिरवळ फुलविण्याचे काम केले आहे. तसेच वेळोवेळी उद्यानाची देखभाल आणि स्वच्छता राखण्याचे प्रयत्नही करण्यात येते.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कॅन्टोन्मेंट बोर्डाकडून उद्यानाकडे लक्ष दिले जात असले तरी निधीअभावी अनेक आवश्यक विकासकामे रखडली आहेत. त्यामुळे आमदार निधीतून या उद्यानासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. उद्यानातील विकासकामांमध्ये प्राधान्याने जॉगिंग ट्रॅक व पादचारी मार्गांवर पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी, याशिवाय उद्यानात येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याचे कुलर, ज्येष्ठ नागरिकांसाठी झाडांच्या भोवती बसण्याचे कट्टे, आधुनिक ओपन जिम तसेच इतर सुशोभीकरणाच्या कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच उद्यान परिसरात रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश उपलब्ध व्हावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ व्हावी यासाठी सर्वत्र लाईट पोल बसविण्याची मागणी करण्यात आली आहे. भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क हे शहर व उपनगरातील नागरिकांसाठी आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक संवादाचे महत्त्वाचे केंद्र बनले असून त्याचा सर्वांगीण विकास झाल्यास नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. त्यामुळे या उद्यानाच्या विकासासाठी भरघोस निधी मंजूर करून कामे तातडीने मार्गी लावावीत, अशी मागणी हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनावर सीए रविंद्र कटारिया, इंजि. नागेश खुरपे, चुन्नीलाल झंवर, वसंत बोरा, ॲड. सुभाष काकडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### घरासमोरून स्कॉर्पिओ एन लंपास; वाहनचोरांचा पुन्हा धुमाकूळ

अहिल्यानगर - शहरातील बालिकाश्रम रोड परिसरातून घरासमोर उभी केलेली महिंद्रा स्कॉर्पिओ एन अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. हिमांशू अमरेंद्र सिंग (वय २४) हे महालक्ष्मी उद्यानाजवळील राजलक्ष्मी बंगल्यात वास्तव्यास आहेत. त्यांनी त्यांच्या वडिलांच्या नावावरील काळ्या रंगाची स्कॉर्पिओ एन (यूपी ३२ क्यूजे ३७२७) घरासमोर लॉक करून उभी केली होती. मात्र २१ मे रोजी सकाळी कामावर जाण्यासाठी बाहेर आल्यानंतर वाहन जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही वाहनाचा मागमूस लागला नाही. विशेष म्हणजे वाहनातील जीपीएस यंत्रणाही बंद असल्याने चोरट्यांनी नियोजनपूर्वक चोरी केल्याचा संशय व्यक्त होत आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. शहरात वाढत्या वाहनचोरीच्या घटनांमुळे वाहनधारकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे.

## साईभक्तीचा सुवर्णयोग! उत्तर प्रदेशातील भक्ताने शिर्डीत साईबाबांना अर्पण केला ९२ लाखांचा सुवर्ण मुकुट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –** श्री साईबाबांवर देश-विदेशातील लाखो भाविकांची अढळ श्रद्धा असून, भाविक मोठ्या भक्तिभावाने बाबांच्या चरणी विविध प्रकारचे दान अर्पण करत असतात. याच अपार श्रद्धेतून आज, शुक्रवार दिनांक २९ मे २०२६ रोजी, उत्तर प्रदेशातील लखनौ येथील साईभक्त श्री. गोविंद गोयल यांनी श्री साईबाबांच्या चरणी एक अत्यंत आकर्षक आणि नक्षीकाम असलेला सुवर्ण मुकुट अर्पण केला आहे.

या भव्य सुवर्ण मुकुटाचे वजन ७८० ग्रॅम असून, त्याची बाजारपेठेतील किंमत सुमारे ९२ लाख ०५ हजार ५६० रुपये इतकी आहे. हा मुकुट म्हणजे साईभक्तांच्या अथांग श्रद्धा आणि भक्तीचे एक अनमोल प्रतीक ठरला आहे.

या दातृत्वाची दखल घेत, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दानशूर साईभक्त श्री. गोविंद गोयल यांचा शाल व श्रीफळ देऊन जाहीर सत्कार केला व बाबांचा प्रसाद प्रदान केला.

यावेळी संस्थानचे अधिकारी, कर्मचारी आणि मंदिरातील पुजारी उपस्थित होते. लखनौ येथील गोयल परिवाराने दाखवलेल्या या दातृत्वाची आणि सुंदर मुकुटाची सध्या शिर्डीत येणाऱ्या भाविकांमध्ये विशेष चर्चा रंगली आहे.

## ढाकणे शैक्षणिक संकुल, शेवगाव येथे मेगा ओपन कॅम्पस ड्राइव्ह २०२६ ला अभूतपूर्व प्रतिसाद

**२२८ विद्यार्थ्यांची विविध नामांकित उद्योगांमध्ये निवड**

(छाया : बाबा पालवे)



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान, संगमनेर संचलित ढाकणे शैक्षणिक संकुल, शेवगाव अंतर्गत समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, डिप्लोमा इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) महाविद्यालय, सुनिताताई एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट तसेच समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. एकनाथरावजी ढाकणे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मेगा ओपन कॅम्पस ड्राइव्ह २०२६ ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या भव्य रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदविला. कॅम्पस ड्राइव्हमध्ये आणि इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थ्यांची मुलाखत व निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये विभागातील १११ व इंजिनिअरिंग विभागातील ११७ अशा एकूण २२८ विद्यार्थ्यांची निवड विविध नामांकित उद्योगांमध्ये करण्यात आली. विद्यार्थ्यांची निवड Vision India Pvt. Ltd., Chromium Engineering Pune, R.S.B. Transmission Pune, Radhe Machinery Pvt. Ltd., Kalyani Tool Pvt. Ltd., Maydiya India Pvt. Ltd., L.T.H. IT Solutions Ahmednagar, John Deere आणि Pratishthan Pvt. Ltd., Paithan या प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक २.१० लाख ते ३.२५ लाख रुपयांपर्यंतचे आकर्षक वेतन पॅकेज प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या संस्थेच्या ध्येयाला या उपक्रमामुळे मोठे यश मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. एकनाथरावजी ढाकणे साहेब, उपाध्यक्ष श्रीकांत ढाकणे, कोषाध्यक्ष हृषीकेश ढाकणे, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व पालक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या मेगा ओपन कॅम्पस ड्राइव्हच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. महेश मरकड, प्रा. अंबादास डोंगरे, प्रा. रियाझखान अत्तार, प्रा. प्रवीण नागरगोजे, समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संतोष आंधळे, निदेशक सुमित वायाळ तसेच निदेशक बोडखे यांनी विशेष परिश्रम घेतले. उद्योग क्षेत्राशी प्रभावी समन्वय साधून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हा मेगा कॅम्पस ड्राइव्ह यशस्वी ठरला असून संस्थेच्या व्यवस्थापनाने त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले आहे.

संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य सातत्याने सुरू असून, भविष्यातही अशा रोजगाराभिमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा पदभार अहिल्यानगरचे जिल्ह्याचे धर्मादाय उपआयुक्त नवनाथ जगताप यांनी स्विकारला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पाथर्डी –** महाराष्ट्र शासनाने नुकताच महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमामध्ये केलेल्या दुरुस्ती प्रमाणे व महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी दिलेल्या संमतीनुसार व अधिनियमातील तरतूदीनूसार, श्री मोहटादेवीचे पूजन करून श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानचा पदभार अहिल्यानगरचे जिल्हयाचे धर्मादाय उप आयुक्त नवनाथ जगताप यांनी नूकताच स्विकारला.

याबाबत महाराष्ट्राचे विधी व न्याय विभागाने नुकतीच अधिसुचना प्रकाशित करून महाराष्ट्रातील महत्वाचे देवस्थानचे नियमन दिवाणी अथवा जिल्हा न्यायालयाकडे होते, ते रद्द करण्याचे राजपत्र प्रकासित करून आता धर्मादाय आयुक्त यांची नियुक्ती केलेली आहे.

यावेळी देवस्थानचा पद्भार स्विकारताना धर्मादाय उप आयुक्त नवनाथ जगताप यांनी भावीक भक्तांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देवून विश्वासाने देवस्थानचे कार्य यापुढेही सुरु ठेवू व देवस्थानचा नावलौकीक देशभरात वाढवू , श्रीक्षेत्र नाशिक येथे होत असलेला आगामी कुंभमेळा पर्णवीमध्ये मोहटादेवी गडावर येणाऱ्या भाविकाकरिता विशेष सुविधा देवस्थान मार्फत उपलब्ध करून दिल्या जातील , तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार व मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य अमोघ कलोती यांचे मार्गदर्शनाखाली चांगला व पारदर्शक कारभार करु, मंदिर परिसर विकास कामावर भर देवू असे प्रतिपादन केले. यावेळी त्यांनी मंदिर परिसर व दानपेटी मोजदाद कार्यक्रमाची पाहणी केली.

याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त अँड,नोटरी पब्लिक विक्रम वाडेकर, बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, बाळासाहेब लाहोटी, शशिकांत दहिफळे, राजेंद्र शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखपाल संदीप घुले तसेच सौ. ममता सुरदुशे (अधीक्षक) विनोद पाटील (निरीक्षक), जिजाबा कुंजीर, श्री कानिफनाथ देवस्थान मढीचे विश्वस्त महादेव कोकाटे, व देवस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिकमध्ये केसांच्या समस्यांवर प्रभावी होमिओपॅथीक उपचार शिबीर

**४ जुन ते १५ जुन २०२६ रोजी आयोजन, होमिओपॅथी औषधोपचारांवर ५० टक्के सवलत**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगरमधील डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिकमध्ये ४ जुन ते १५ जुन २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ व सायंकाळी ५ ते रात्री ८ या कालावधीत केसांच्या समस्यांवर होमिओपॅथीक उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सुंदर व निरोगी केसांसाठी अतिशय प्रभावी होमिओपॅथी उपचार शिबिरात केले जातील. शिबिरात औषधोपचारांवर ५० टक्के सवलत दिली जाणार आहे, अशी माहिती होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. प्रतिमा बोरा यांनी दिली.



बदलती जीवनशैली, अयोग्य आहारविहार यामुळे शरीरातील विविध अवयवांवर जसे परिणाम होतात तसेच परिणाम केसांच्या आजवरही होतात. कमी वयात केस गळणे, कोंडा होणे, चाई लागणे, टक्कल पडणे, अकाली केस पांढरे होणे, वाढ खुंटणे, उवा होणे अशा अनेक समस्या निर्माण होतात. या सर्व समस्यांवर होमिओपॅथीक उपचार पद्धतीत परिणामकारक औषधोपचार उपलब्ध आहेत. अतिशय सुरक्षित, दुष्परिणाम रहित, वेदनाविरहित, खात्रीशीर व दीर्घकालीन उपचार होमिओपॅथीचे वैशिष्ट्य आहे. महत्वाचे म्हणजे आहारावरही कोणते बंधन नाही. विना इंजेक्शन, विना शस्त्रक्रिया असलेल्या होमिओपॅथी उपचारात होमिओपॅथी औषधांचे कुठलेही साईड इफेक्ट होत नाहीत. केसांची समस्या मुळापासून दूर होण्यास होमिओपॅथी उपचार पद्धतीचा निश्चितच उपयोग होतो. आकर्षक दिसण्यासाठी केसांचे आरोग्य महत्वाचे असते. विशेषतः महिला केसांच्या बाबतीत खूप सजग असतात.

मुलांपासून मोठ्यापर्यंत सर्वांच्याच केसांच्या आरोग्याची काळजी होमिओपॅथी उपचार पद्धती घेत असते. या खात्रीशीर उपचारांचा शिबिरातुन जास्तीत जास्त रुग्णांनी शिबिरासाठी नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी डॉ. बोरा होमिओपॅथी क्लिनिक, नक्षत्र मेडिकल मागे, चाणक्य चौक, अहिल्यानगर अथवा ९८२२६४६५८८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## आरक्षणाच्या नावाखाली जाती-जातींत संघर्ष पेटवण्याचे सरकारचे कारस्थान – डॉ. सिद्धार्थ शिनगारे

**१५ जूनला अहिल्यानगरात सभा; फुले-शाहू-आंबेडकर चळवळीच्या कार्यकर्त्यांचा एकमुखी पाठिंबा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र सरकार आरक्षणाच्या मुद्द्यावरून विविध समाजघटकांमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम करत असून, समर्थक जातींना एकमेकांविरुद्ध उभे करण्याचे षडयंत्र राबवत आहे. समाजातील विविध प्रश्नांपासून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी जाती-जातींमध्ये संघर्ष, दंगली आणि वाद निर्माण करण्याचे कारस्थान सरकारकडून सुरू असल्याचा गंभीर आरोप अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचे अभ्यासक डॉ. सिद्धार्थ शिनगारे यांनी केला.

अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी १० जूनपासून बीड येथून निघणाऱ्या राज्यव्यापी लाँग मार्च १५ जून रोजी अहिल्यानगर शहरात येणार आहे. त्याच्या नियोजनार्थ फुले-शाहू-आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. विजय भांबळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत एन. एम. पवळे, पी. पी. खंडागळे, निवृत्ती आरु, राजीव साळवे, सुहास धीवर, संजय कांबळे, धम्मपाल विद्याधर यांच्यासह विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.



बैठकीत बोलताना डॉ. शिनगारे यांनी सरकारच्या आरक्षण धोरणावर टीका करताना सांगितले की, एससी उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे आलेला असताना त्यामधील ५८ जाती या उपवर्गीकरणाच्या विरोधात आहे. एकाच जातीची मागणी असून, त्यामधील निम्मे लोक देखील याला विरोध दर्शवित आहे. आरक्षणावरुन विविध जातींना एकमेकांविरोधात उभे केले जात आहे. हे सर्व कारस्थान सरकारपक्षातील व्यक्तींकडूनच राबविले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

आरक्षणावरुन ओबीसी आणि मराठा समाजातील संघर्ष देखील सरकारने लावून दिला आहे. धनगर समाज आदिवासी प्रवर्गात समावेशाची मागणी करत असताना आदिवासी आणि धनगर समाजात संघर्ष निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केले. समाजात ऐक्य निर्माण करण्याऐवजी विविध समाजघटकांना परस्परविरोधी बनवून राजकीय लाभ मिळविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. शिनगारे पुढे म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली असून त्याबाबत समाजात तीव्र असंतोष आहे. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी उपवर्गीकरणासंदर्भात निर्णय दिला. त्यानंतर अवघ्या अडीच महिन्यांत आनंद बदर आयोगाने शासनाला अहवाल सादर केला. त्या अहवालाच्या आधारे राज्य सरकार उपवर्गीकरणाची प्रक्रिया राबवत आहे.

मात्र भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ नुसार अनुसूचित जातींच्या आरक्षणासंदर्भातील अधिकार राष्ट्रपती आणि संसदेला आहेत. असे असताना सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना अधिकार बहाल करून घटनाबाह्य आणि संविधानविरोधी निर्णय दिल्याचा दावा त्यांनी केला.

## डॉ.सुनिल सकट यांचा विवीध सामाजिक संस्थांच्या वतीने सत्कार

**मानद डॉक्टरेट मिळाल्याबद्दल विशेष सन्मान । 'सामाजीक व पर्यावरण क्षेत्रात डॉ.सुनिल सकट यांचे मोठे योगदान- अशोक शिंदे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सुनिल सकट यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात विविध उपक्रम राबविले आहेत.गरजू,वंचित आणि दुर्बल घटकांसाठी मदतकार्य,पर्यावरण संवर्धन मोहिम, सामाजिक जनजागृती, तसेच युवकांना, महिलांना प्रेरणा देणारे उपक्रम यांच्या माध्यमातून त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.त्यांच्या कार्याचा गौरव यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या प्रतिष्ठित 'साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्काराने' देखील सन्मानीत करण्यात आले आहे.

सामाजीक, पर्यावरण आणि वंचित घटकांसाठी सातत्याने कार्य करणारे महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न



लोकशाहिर डॉ.अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त सुनिल सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाली.ही अभिमानास्पद बाब आहे.असे प्रतिपादन ''शाहु फुले आंबेडकर, साठे, कलाम सामाजीक विचारमंच'' चे सरसंस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे यांनी केले आहे.

अहिल्यानगर एम.आय.डि.सी चेतना कॉलनी येथील कार्यालयात दिल्ली येथील ''मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशन'' च्या वतीने नुकतीच त्यांना सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सामाजिक कार्यकर्ते सुनील सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल भव्य सत्कार सोहळा पार पडला.या कार्यक्रमात ''इंटरनॅशनल ह्युमन राईट असोसिएशन'' चे रोहीदास केदार व माजी सैनीक तेलोरे मेजर तसेच विविध संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुनिल सकट यांच्या कार्याचे कौतुक केले.

सामाजिक बांधीलकी जपत सुनिल सकट यांनी समाजसेवा तसेच पर्यावरणाचे निरंतर कार्य करत भारत सरकार कडे मरणोत्तर देहदान संकल्प केला. तर त्यांच्या परीवाराने मरणोत्तर नेत्रदान संकल्प करुन मानवतावादी परोपकारी संदेश दिला आहे.सकट हे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही समाजकार्यात व पर्यावरण क्षेत्रात सक्रीय आहेत.त्यामुळे जिल्ह्यात त्यांचे विशेष कौतुक होत आहे. सत्काराला उत्तर देताना सुनिल सकट म्हणाले की, ''समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांच्यासाठी काम करणे हेच माझे आद्यकर्तव्य आहे.

सामाजिक कार्यासाठी भारतीय लहुजी सेना,शाहु फुले आंबेडकर साठे कलाम सामाजीक विचारमंच च्या माध्यमातून मोठे विचारपीठ मिळाले असून, भविष्यातही अधिक जोमाने समाजसेवा व पर्यावरण क्षेत्रात कार्य करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# माऊलींच्या संजीवन समाधीचे वर्णन म्हणजे भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचा दिव्य संगम - ह.भ.प. निळकंठ देशमुख

### माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्याच्या वर्णनाने भाविक भारावले । ह.भ.प. निळकंठ देशमुख यांचे रसाळ निरूपण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अधिक मासानिमित्त सुरू असलेल्या सनातन धर्म सभेमध्ये ह.भ.प. निळकंठ देशमुख यांनी ''माऊली संजीवन समाधी सोहळा'' या विषयावर केलेल्या हृदयस्पर्शी प्रवचनाने उपस्थित भाविकांना संतसाहित्य, भक्ती आणि अध्यात्माच्या अद्भुत विश्वाची अनुभूती दिली. माऊलींच्या संजीवन समाधीचे वर्णन करताना त्यांनी संत नामदेव महाराजांच्या गाथेतील दाखल्यांच्या आधारे समाधी सोहळ्याचा दिव्य आणि अलौकिक प्रसंग उलगडून सांगितला.

प्रवचनात त्यांनी सांगितले की, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्यासाठी स्वतः पांडुरंग परमात्मा, विविध ऋषी-मुनी, संत-महात्मे आणि देवगण उपस्थित होते. त्या दिव्य सोहळ्याच्या स्वागतासाठी विश्वकर्म्याने संपूर्ण अलंकापुरी नगरी चंदनाच्या कमानींनी सजविली होती. सुगंधी फुले, विविध वेलींनी नटलेली नगरी विलक्षण तेजाने उजळून निघाली होती. अलंकापुरीतील प्रत्येक कण भक्ती आणि चैतन्याने भारलेला होता.

समाधी सोहळ्याच्या दिवशी माऊलींचे परमभक्त संत चांगदेव महाराज यांनी माऊलींची पाद्यपूजा केली. एकादशीच्या दिवशी माऊलींचे अखेरचे प्रवचन झाले. त्या प्रवचनात त्यांनी सद्गुरूंचे महात्म्य, अध्यात्मातील गुरुतत्त्वाचे स्थान आणि मानवकल्याणाचा संदेश देणाऱ्या पसायदानाचे स्मरण करून दिले. माऊलींच्या प्रत्येक शब्दातून करुणा, ज्ञान आणि विश्वकल्याणाची भावना प्रकट होत होती.

यानंतर रात्री संत नामदेव महाराजांचे कीर्तन झाले. कीर्तनातून भक्तीचा महासागर उसळला आणि संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला. द्वादशीला पारणे झाल्यानंतर माऊलींनी संजीवन समाधी स्वीकारून हा अद्वितीय समाधी सोहळा पूर्णत्वास नेला. त्या वेळी स्वर्गातून पुष्पवृष्टी झाल्याचे वर्णन संत नामदेव महाराजांनी आपल्या गाथेत केले असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

माऊली समाधीत जात असताना उपस्थित संत, महात्मे आणि भक्तगणांच्या मनात अपरंपार दुःख दाटून आले होते. मात्र स्वतः माऊली पूर्णपणे शांत, स्थिर आणि निर्विकार अवस्थेत होते. संसाराच्या पलीकडील आत्मज्ञानाची सर्वोच्च अवस्था त्यांनी त्या प्रसंगी जगासमोर ठेवली. आजही माऊलींच्या समाधीचे वर्णन वाचताना आणि ऐकताना भाविकांचे अंतःकरण हेलावून जाते, असे त्यांनी नमूद केले.

देशमुख यांनी पुढे सांगितले की, या सर्व घटनांचे सविस्तर आणि जिवंत वर्णन संत नामदेव महाराजांनी आपल्या गाथेत जतन करून ठेवले आहे. त्यामुळे सुमारे सातशेहून अधिक वर्षांनंतरही भक्तांना त्या दिव्य सोहळ्याचा अनुभव शब्दांमधून घेता येतो. संत नामदेवांनी केलेल्या या वर्णनामुळे माऊलींच्या समाधी सोहळ्याचे चैतन्य आजही जिवंत असल्याची अनुभूती भाविकांना मिळते.

प्रवचनादरम्यान माऊलींच्या संजीवन समाधीमागील तत्त्वज्ञान, गुरुपरंपरेचे महत्त्व, भावदीपिकेतील विचार आणि भक्तीमार्गाचे विवेचन अत्यंत ओघवत्या शैलीत करण्यात आले. त्यामुळे उपस्थित श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते.

कार्यक्रमास उमेश नगरकर, निसळशास्त्री, उमेश वाळुंजकर, निलेश धर्माधिकारी, डॉ. मुंबई दिनकर देशमुख, गावडे प्रदीप, हेमंत देशमुख तसेच गीता मंडळाच्या भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

संत नामदेव गाथेत जतन झालेला समाधी सोहळामाऊलींच्या समाधी सोहळ्यासाठी स्वयं पांडुरंग परमात्मा उपस्थित होते. विश्वकर्म्याने अलंकापुरीत चंदनाच्या कमानी उभारल्या होत्या.संत चांगदेव महाराजांनी माऊलींची पाद्यपूजा केली.

एकादशीला माऊलींचे अखेरचे प्रवचन झाले.रात्री संत नामदेव महाराजांचे कीर्तन संपन्न झाले.द्वादशीला पारणे झाल्यानंतर माऊलींनी संजीवन समाधी स्वीकारली. समाधीवेळी स्वर्गातून पुष्पवृष्टी झाल्याचे वर्णन गाथेत आढळते. संत नामदेव महाराजांच्या गाथेमुळे हा दिव्य प्रसंग आजही भाविकांना अनुभवता येतो.

# कल्पतरू राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत अहिल्यानगरच्या कन्यांची दमदार कामगिरी

### स्वरा होशिंग आणि थरूनिका ढगे यांना द्वितीय पारितोषिक; शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सोलापूर येथे दिनांक ३० व ३१ मे रोजी कल्पतरू शास्त्रीय कला आणि सांस्कृतिक प्रतिष्ठान, सोलापूर तसेच नाट्यकेशी कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित कल्पतरू राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत अहिल्यानगरच्या कु. स्वरा क्षितिजा संकेत होशिंग आणि कु. थरूनिका अशोक ढगे यांनी आपल्या उत्कृष्ट नृत्य सादरीकरणातून द्वितीय पारितोषिक पटकावून शहराचे नाव उज्ज्वल केले.

देशभरातील विविध राज्यांमधून सहभागी झालेल्या स्पर्धकांमध्ये अत्यंत चुरशीची स्पर्धा झाली. अशा स्पर्धेत आपल्या कला, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर दोन्ही विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करत परीक्षकांची विशेष दाद मिळवली. त्यांच्या सादरीकरणातील ताल, भाव, लयबद्धता आणि नृत्यावरील प्रभुत्व यामुळे उपस्थित प्रेक्षकही मंत्रमुग्ध झाले.

या यशामागे नृत्यदर्पणच्या सौ. अपर्णा थत्ते मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थिनींना सातत्याने प्रशिक्षण देत नृत्यकलेतील बारकावे शिकविले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच या विद्यार्थिनींना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत यश मिळवता आले, अशी भावना पालकांनी व्यक्त केली.

सोलापूर येथे आयोजित कल्पतरू फेस्टिव्हल या प्रतिष्ठित नृत्य स्पर्धेमध्ये सोनू डान्स अकॅडमीच्या विद्यार्थिनींनीही उल्लेखनीय कामगिरी केली. क्लासिकल, फोक आणि विविध नृत्यप्रकारांमध्ये सहभाग घेत त्यांनी अनेक पारितोषिकांवर आपले नाव कोरले. त्यामुळे अकॅडमीच्या यशामध्ये आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

यशस्वी विद्यार्थिनींचे औद्योगिक वसाहतीतील उद्योजक नवनाथ गोसावी, अरुण रासकर, दीपक तवर, भूपेंद्र रासने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामुळे शहरातील इतर विद्यार्थ्यांनाही नृत्यकलेत प्राविण्य मिळविण्यासाठी प्रेरणा मिळणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कु. स्वरा होशिंग या कैसर्स फाऊंडेशन स्कूलमध्ये शिक्षण घेत असून, कु. थरूनिका ढगे या आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनी आहेत. शालेय शिक्षणासोबतच नृत्यकलेचा सातत्याने सराव करून त्यांनी मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही आपली प्रतिभा जोपासणे आवश्यक आहे. स्वरा आणि थरूनिका यांनी राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले यश हे केवळ वैयक्तिक यश नसून संपूर्ण अहिल्यानगरसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या सर्व गुणी विद्यार्थिनींचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक गुरुजनांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून भविष्यातही त्या अशाच प्रकारे यशाची नवी शिखरे सर करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# थकीत वेतन, पीबीआय व बदलीच्या मागण्यांसाठी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे अन्नत्याग आंदोलन

### ऑनलाइन काम बंद; जिल्हा परिषद कार्यालयासमोर एकदिवसीय आंदोलन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेच्या वतीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. यासोबतच समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी ऑनलाइन काम बंद आंदोलनही सुरू केले आहे.

संघटनेच्या वतीने तीन महिन्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करावे, पाच महिन्यांपासून प्रलंबित असलेला कामावर आधारित मोबदला () द्यावा, जिल्हा अंतर्गत बदल्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात तसेच कोविड काळातील फरकाची रक्कम त्वरित अदा करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. शैलेश पवार, उपजिल्हाध्यक्ष सूर्यकांत यादव, सचिव अक्षय जवरे, डॉ. प्रीती सैदोरे, डॉ. नूतन कडलग, डॉ. शितल चौधरी, प्रवीण राठोड, डॉ योगिता शेजाळ, डॉ सविता कुटे, डॉ वैष्णवी गोपालघरे,डॉ. दिनेश भोज, अक्षय अनाप, राम भवानी, विजय शिंदे, नाईकवाडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व समुदाय आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे डिसेंबर, जानेवारी, मार्च आणि एप्रिल महिन्यांचे कामावर आधारित मोबदला () तसेच मार्च आणि एप्रिल महिन्यांचे मूलभूत मानधन अद्याप प्रलंबित आहे. शासनाकडून पगार वितरणासाठी निधी उपलब्ध होऊनही वेतन वितरणाबाबत राज्य शासनाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

जिल्हा परिषद अहिल्यानगरकडून वेतन वितरणासंदर्भातील आवश्यक माहिती राज्य शासनाकडे पाठविण्यात आली असतानाही अद्याप वेतन अदा करण्यात आलेले नाही. परिणामी, गेल्या अनेक महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून उपकेंद्रापर्यंत जाण्याचा खर्च भागविणेही कठीण झाले आहे, अशी खंत आंदोलकांनी व्यक्त केली.

''प्रत्येक कर्मचारी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी काम करतो. मात्र वेळेवर मानधनच मिळत नसेल तर जगायचे कसे?'' असा सवाल उपस्थित करत संघटनेने शासनाने तातडीने मागण्यांची पूर्तता करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे.

समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तत्काळ निर्णय घेऊन थकीत वेतन, पीबीआय, कोविड काळातील फरकाची रक्कम आणि बदली प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# साईदीप हिरोजवर मात करत एसके बी संघाचा दिमाखदार विजय

### कृष्णा जाधव सामनावीर; १२ वर्षांखालील लेदर बॉल टी-२० क्रिकेट लीगचा थरार रंगला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरातील वाकोडी येथील साईदीप क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या १२ वर्षांखालील मुलांच्या लेदर बॉल टी-२० क्रिकेट लीग स्पर्धेचा अंतिम सामना अत्यंत रंगतदार वातावरणात पार पडला. अंतिम सामन्यात एसके बी संघाने साईदीप हिरोज संघावर ७ गडी राखून शानदार विजय मिळवत विजेतेपद पटकावले. लहानग्या क्रिकेटपटूंनी दाखवलेल्या खेळकौशल्यामुळे उपस्थित प्रेक्षकांनी सामन्याचा मनमुराद आनंद लुटला.

अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना साईदीप हिरोज संघाने २५ षटकांत ४ गडी गमावत १२२ धावांचे आव्हान उभे केले. संघाच्या डावात आदर्श पटेल याने संयमी व आकर्षक फलंदाजी करत ५८ चेंडूत ५५ धावांची खेळी साकारली. त्याला वरद कुलांगे याने ३६ धावांची मोलाची साथ दिली. दोघांच्या भागीदारीमुळे साईदीप हिरोज संघाला समाधानकारक धावसंख्या उभारता आली.

१२३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना एसके बी संघाने सुरुवातीपासूनच आत्मविश्वासपूर्ण खेळ केला. संघाकडून कृष्णा जाधव याने ५१ चेंडूत ५० धावांची दमदार खेळी करत विजयाचा पाया रचला. धनंजय जरे यानेही ४८ धावांची प्रभावी खेळी साकारत संघाला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. एसके बी संघाने २३.१ षटकांत ३ गडी गमावत १२५ धावा पूर्ण करून ७ गडी राखून दिमाखदार विजय मिळवला. उत्कृष्ट फलंदाजीसाठी कृष्णा जाधव याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास नगरचे सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ व साईदीप सह्याद्री हॉस्पिटलचे संचालक डॉ. किरण दीपक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी उपस्थित मुलांना मार्गदर्शन करताना मैदानी आणि सांघिक खेळांचे जीवनातील महत्व अधोरेखित केले. नियमित खेळामुळे शरीर निरोगी राहण्यासोबतच मानसिक स्वास्थ्य टिकून राहण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. तसेच खेळामुळे शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित होते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी गॅलेक्सी नॅशनल स्कूलच्या संचालिका देविका देशमुख यांचीही प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी संदेश दिला. स्पर्धेतील वैयक्तिक पुरस्कार पुढीलप्रमाणे प्रदान करण्यात आले : उत्कृष्ट फलंदाज : यशार्थ पारधे, उत्कृष्ट गोलंदाज : समायरा देशमुख,मालिकावीर : साई धाकतोडे

स्पर्धेच्या यशस्वी अयोजनाबद्दल साईदिप अकॅडमी चे संचालकसंदीप घोडके , यांनी मुख्य प्रशिक्षक तेजस करमरकर व सहाय्यक परेश रासकर यांचे कौतुक केले.

(पान १ वरून)

## लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या पुरुषांकडून सगळे पैसे वसूल करणार!

चारचाकी डेटाबेसची माहिती घेतली आणि त्यानंतर आपल्या लक्षात आलं, की ५ लाख असे आहेत ज्यात चारचाकी आहे. १४ हजार पुरुष निघालेत. अडीच लाख रुपयांपैक्षा उत्पन्न अधिक आहे, असे पण काहीजण निघाले. केवायसी करून घ्या सांगितलं, मात्र ती झाली नाही. त्यामुळे अपात्रांची संख्या ८० लाखांवर गेली, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली. ज्यांना अर्ज करता येतो त्यांना कागदपत्र केवायसी करता न येणे हे मान्य नाही. कुठला एक निकष पार पाडत नाही, म्हणून त्यांनी केवायसी केली नाही. योजना पात्रतेचे निकष पूर्ण करताना दिसत नाही. १ कोटी ७० लाख महिला निकष पूर्ण करतात त्यांना पैसे मिळत राहतील. केवायसी न केलेल्या त्यांना पैसे देणार नाही. मात्र बहीणींकडून पैसे पुन्हा पण घेणार नाही. लाडकी बहिणींचे पैसे घेणारे १४ हजार पुरुष निघालेत. या पुरुषांकडून फसवणूक करुन घेतलेले सर्व पैसे वसूल करणार आहोत, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली. तसेच लाडकी बहीण केवायसी करणार असेल तर आम्ही पुन्हा विंडो ओपन करायला तयार आहोत, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## समृद्धी महामार्गावर लुटमार करणारी सहाजणांची आंतरजिल्हा टोळी जेरबंद

बळजबरीने चोरून नेला. या टोळीने ३ वाहने अडवून एकूण १ लाख ५० हजार ४१५ रुपयांचा ऐवज लुटला होता. याप्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी तातडीने घटनास्थळाची पाहणी केली व तपासासाठी विशेष पथक रवाना केले.

तांत्रिक कौशल्य आणि खबऱ्यांच्या माहितीवरून १ जून रोजी पथकाने सर्वप्रथम अंबड (जि. जालना) येथून निखिल बद्रीनारायण गोरे (वय १९) आणि एका १७ वर्षीय विधीसंघर्षीत बालकाला ताब्यात घेतले. त्यांच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीनुसार, २ जून रोजी कोकमठाण (ता. कोपरगाव) येथून शिवनाथ शांताराम आव्हाड (वय २४, रा. शिर्डी), ओम बालाजी खरात (वय १९, रा. जालना/संभाजीनगर), राहुल साधाकिसन कोकाटे (वय २३, रा. पैठण) आणि साईराज गणेश शहाणे (वय २१, रा. साकुरी, राहाता) यांना अटक करण्यात आली.

आरोपींच्या ताब्यातून लुटमारीत वापरलेल्या किंवा मिळालेल्या पैशातून घेतलेल्या दोन कार, ६ मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण ९ लाख २८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींनी गुन्ह्यात आणखी ३ साथीदार असल्याचे कबूल केले असून, पुढील तपासासाठी आरोपींना कोपरगाव तालुका पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे.

## धारदार कोयत्यांसह चार सराईत जेरबंद

प्रतीक बाबासाहेब शिंदे (वय २५, रा. नागापूर), संदेश रवींद्र आंग्रे (वय २१, रा. नवनागापूर) यांना ताब्यात घेतले. चौघेही सराईत गुन्हेगार असून, त्यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, पोसई विकास जाधव, सफौ राकेश खेडकर, सुभाष म्हस्के, सचिन आडबल, किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, ज्ञानेश्वर आघाव, सुरज देशमुख, दीपक फुंदे आणि उमेश शेरकर यांच्या पथकाने ही कारवाी केली.

## स्व.बाळासाहेब विखे यांचे दुष्काळ मुक्तीचे स्वप्न ना.विखे यांनी पूर्ण करावे - अण्णासाहेब हजारे

जात असल्याबद्दल समाधान व्यक्त करून श्री.हजारे म्हणाले, '' स्व. खा.बाळासाहेब विखे पा. यांनी महाराष्ट्र दुष्काळ मुक्त करण्याची संकल्पना अनेक वर्षापूर्वी मांडली होती. या संदर्भात त्यांनी तज्ञांच्या मदतीने महत्त्वपूर्ण आराखडा देखील तयार केला होता. प्रामुख्याने कोकणातील पाणी घाटमाथ्यावर आणण्याच्या संदर्भात आणि नदीजोड प्रकल्पाबाबत त्यांच्या मनामध्ये नावीन्यपूर्ण कल्पना होत्या. या कल्पना प्रत्यक्षात आणून आता मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्व. विखे पा. यांचे स्वप्न साकार करावे,'' अशी अपेक्षा श्री. हजारे यांनी व्यक्त केली.

## खा. संजय राऊतांनी घेतला शहर ठाकरे शिवसेनेचा संघटनात्मक आढावा

शंकर आव्हाड, गणेश आपरे आदींसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी किरण काळे यांनी शहर शिवसेनेच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा मांडला. नव्या जुन्यांचा मेळ घालत शहर कार्यकारणीची पुनर्रचना केली जाणार आहे. शहरातील १७ प्रभागांकरिता प्रभाग प्रमुख यांच्या आधी नियुक्त केल्या जाणार आहेत. त्यानंतर शाखा प्रमुख नियुक्त केले जाणार आहेत. भिंगार साठी स्वतंत्र शहर प्रमुख दिला जाणार असून भिंगार करिता नवीन कार्यकारणी गठीत केली जाणार असल्याचे काळे यांनी म्हटले आहे. जिल्हा संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे हे देखील उपस्थित होते.

## धक्कादायक... पाचोडमध्ये नराधम तरुणाने ८० वर्षीय वृद्ध महिलेवर केला अत्याचार

आणि या घटनेची माहिती पसरल्याने पाचोड पोलीस ठाण्यात मोठ्या प्रमाणात नागरिकांनी रात्री बारा वाजेपर्यंत गर्दी केली होती त्यामुळे काहीकाल तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती परंतु पोलिसांनी नागरिकांना कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपस्थित जमाव माघारी परतला.

## खोटा गुन्हा मागे घेऊन फिर्यादीवर कारवाई करा; समस्त आंबेडकरी समाजाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मात्र, या फिर्यादीत सुमेध गायकवाड यांचे नाव नमूद करून त्यांच्यावर गंभीर व खोटे आरोप करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

सुमेध गायकवाड हे संबंधित घटनास्थळी उपस्थित नसतानाही त्यांचे नाव गुन्ह्यात गोवण्यात आले असून, यामुळे त्यांचे कुटुंबीय तसेच आंबेडकरी समाजामध्ये तीव्र नाराजी व संतापाची भावना निर्माण झाली आहे. खंडणीसारख्या गंभीर गुन्ह्यात विनाकारण नाव समाविष्ट करून त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकाराचा समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सुमेध गायकवाड यांच्यावरील कथित खोटा गुन्हा मागे घेण्यात यावा तसेच चुकीची व दिशाभूल करणारी फिर्याद दाखल करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.